MC letter

**तातडीचे**

**महत्वाचे**

# मुंबई विद्यापीठ

EAU/ICD/2012-13/4

**परिपत्रक :**

माननीय कुलगुरूंच्या आदेशानुसार विद्यापीठाच्या संचालक, महाविद्यालय आणि विद्यापीठ विकास मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, प्रभारी परीक्षा नियंत्रक, संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, प्राध्यापक-नि-संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, संचालिका, बहि:शाल शिक्षण मंडळ, संचालक आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग, सर्व उप-कुलसचिव आणि सहायक कुलसचिव, विद्यापीठ अभियंता, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील विविध विभागांचे प्रमुख यांना असे कळविण्यात येते की, आपल्या विभागामार्फत व्यवस्थापन परिषदे पुढे ठेवावयाच्या बाबी कुलगुरूंच्या मान्यतेनंतर मुळ कागदपत्रांसह हे परिपत्रक मिळाल्यापासून सात दिवसाच्या आत कार्यकारी प्राधिकरणे विभागात पाठविण्यात याव्यात.

व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना कार्यसूची सोबत पाठविण्यासाठी जोडपत्र देताना कोणत्याही प्रकारचा अभिप्राय किंवा स्वाक्षरी त्यावर येणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

व्यवस्थापन परिषदे पुढे ठेवावयाच्या बाबी मराठी संस्कृत फॉन्टमध्ये पाठवाव्यात तसेच परिशिष्ट असल्यास त्यांच्या ४० प्रती पाठवाव्यात.

मुंबई ४०० ०३२,<br>
०६ नोव्हेंबर, २०१२.

(कुमार खैरे)<br>
कुलसचिव